# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 June 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ जून २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू-काश्मीर दौऱ्यात जगातील सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं उद्घाटन केलं. तत्पूर्वी त्यांनी संपूर्ण पुलाची पाहणी केली. तसंच त्यांनी उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वेलिंक आणि चिनाब पुल निर्मितीत सहभागी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. चिनाब नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला रेल्वे पूल हा जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज आहे. एक हजार ३१५ मीटर लांबीचा पूल स्टीलपासून तयार केला आहे.

पंतप्रधानांनी कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी-श्रीनगर वंदे भारतला हिरवा झेंडा दाखवला. या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमात ४६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि राष्ट्रार्पण पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय युवकांची वैश्विक कामगिरी अधोरेखीत केली आहे. केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचे ११ वर्ष पूर्ण झाले, त्यानिमित्तच्या संदेशात पंतप्रधान म्हणाले की, आजचा युवक गतीमान, नवोन्मेषी आणि दृढनिश्चयाचं प्रतीक आहे. गेल्या ११ वर्षांत देशानं स्टार्ट अप, विज्ञान, क्रीडा, समुदाय सेवा आणि सांस्कृतिक क्षेत्रात युवा वर्गानं अप्रतिम योगदान दिल्याचं मोदी म्हणाले.

****

ऑपरेशन सिंदूर नंतर भारताने दहशतवादाविरोधातील भूमिका जगासमोर मांडण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळं विविध देशांना पाठवले होती. त्यापैकी खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ जर्मनीत पोहोचलं आहे. ७ जूनपर्यंत हे शिष्टमंडळ जर्मन संसद सदस्य आणि जर्मनीच्या संघीय परराष्ट्र

कार्यालयातील वरिष्ठ मान्यवरांशी चर्चा करेल. शिष्टमंडळ जर्मनीतील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि भारतीय समुदायाच्या प्रमुख प्रतिनिधींशी संवाद साधणार आहे.

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणूक संपल्यानंतर जाहीर करण्यात येणारे आकडेवारी विषयक विविध अहवाल जलद गतीनं तयार करण्यासाठी इंडेक्स कार्ड ही एक नवी अद्ययावत प्रणाली सुरू केली आहे. इंडेक्स कार्ड ही निवडणूक आयोगाची मात्र कायद्यानं बंधनकारक नसलेली माहितीप्रणाली असेल. या माध्यमातून निवडणुकीनंतरची महत्त्वाची आकडेवारी संकलित केली जाईल. संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते, पत्रकार आणि सामान्य नागरिकांना मतदार संघ निहाय माहिती सुलभतेनं उपलब्ध व्हावी, हा या मागचा हेतू असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. या इंडेक्स कार्डमध्ये उमेदवार, मतदार, मतदानाची टक्केवारी, मतमोजणीचा तपशील, पक्ष आणि उमेदवारांना मिळालेली मते, लिंगभावानुसार मतदानाचं स्वरूप, प्रादेशिक स्तरावरचा फरक आणि राजकीय पक्षांची कामगिरी या आणि अशा स्वरुपाची माहिती मिळू शकणार आहे.

****

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज रायगड किल्ल्यावर साजरा होत आहे. आज सकाळी पारंपारीक पद्धतीनं शिवराज्याभिषेक सोहळ्याला सुरूवात झाली. संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती आणि दुर्गराज रायगड यांच्या वतीनं शिवराज्याभिषेक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. `जागर शौर्य भक्ती`चा हा कार्यक्रम, युद्धाचे प्रात्यक्षिक, ढोलताशांचा गजर आणि लेझीमची प्रात्यक्षिके यासारख्या विविध कार्यक्रमांचं योवळी आयोजन करण्यात आलं आहे. सोहळ्याच्या पूर्वसंध्येला राजमाता जिजाऊ यांच्या पाचाड इथंल्या समाधीला अभिवादन करण्यात आलं. तसंच नगारखाना इथं विधिवत गडपूजन करण्यात आलं. पुण्यात अखिल भारतीय शिव महोत्सव समिती, मराठा सेवा संघ आणि इतर शिवप्रेमी संघटनांच्या वतीनं लाल महाल इथं तसंच राज्यातल्या विविध गड किल्ल्यांवर विविध कार्यक्रमांचं अयोजन यानिमित्त करण्यात आलं आहे.

दरम्यान, शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये देशाचा जाज्वल्य इतिहास आणि समर्पणाची भावना रुजावी या हेतूनं आजपासून सर्व आयटीआय

संस्थांमध्ये राष्ट्रभक्तीच्या विषयावर व्याख्यानमालांचं आयोजन केलं आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजामाध्यमावरील संदेशात दिली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महिला बचत गटांना कृषी प्रक्रिया उद्योग क्षेत्रात वाव असून त्यात त्यांनी पदार्पण करावं. त्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळानं त्यांना प्रशिक्षण, अर्थसहाय्य, बाजारपेठ उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी आज दिले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा सल्लागार समितीची बैठक आज पार पडली, त्यात ते बोलत होते. जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळाचे दोन हजार २०३ महिला बचतगट आहेत. त्यात २२ हजार ८७० महिला सभासद आहेत.

****

आगामी आषाढी एकादशीची तयारी राज्यभरात सुरु झाली आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा १८ जून रोजी सुरू होईल आणि त्याच दिवशी पालखी देहूतून प्रस्थान ठेवणार आहे. तर, संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचं प्रस्थान १९ जून रोजी आहे. दरवर्षी देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात येतात.

****